# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 11.04.2024** **वार: गुरुवार**

---

**महात्माफुले**

सामाजिक कार्यकर्ते, समाज सुधारक आणि साहित्यिक महात्मा ज्योतिबा फुले यांची आज जयंती आहे. त्यानिमित्त पुण्यात भिडे वाड्यात समता भूमी इथं आज विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. विविध पक्षाच्या नेत्यांनी तसंच अनेक नागरिकांनी आज महात्मा फुले यांना अभिवादन केलं.

**नरके**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श जयंती उत्सव समितीतर्फे महात्मा ज्योतीबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त फुले-शाहू-आंबेडकर चळवळीचे अभ्यासक प्रा. हरी नरके यांना मरणोत्तर राष्ट्रपितामह ज्योतिबाराव फुले पुरस्कार आज देण्यात आला. तर माईंड पॉवर ट्रेनर आणि राष्ट्रीय प्रबोधनकार डॉ. दत्ता कोहिनकर यांना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारानं गौरवण्यात आले. पुण्यात महात्मा फुले वाड्यात समता भूमी इथं या सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. पुरस्काराचं वितरण माजी मंत्री रमेश बागवे यांच्या हस्ते झालं. पुरस्काराचं हे पहिलं वर्ष आहे. पुरस्कारामुळे सामाजिक जबाबदारी वाढली असल्याचं सत्काराला उत्तर देताना कोहिनकर म्हणाले. भविष्यात सामाजिक कार्यातील वाटचाल अधिक जोमानं असेल असंही ते म्हणाले.

**फुले**

महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं आजपासून 15 एप्रिल पर्यंत प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात आलं आहे. याचं उद्घाटन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आलं. शाहीर सुरेश सूर्यवंशी यांच्या गाथा महामानवांची या पोवाड्याने या पर्वाला प्रारंभ झाला.

**ईद**

ईद ऊल फित्र अर्थात रमजान ईद निमित्त आज सकाळी पुणे सोलापूर रस्त्यावरील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम धर्मीय नागरीकांनी सामुहिक नमाज अदा केली. मौलाना निजामुद्दीन फकरूद्दीन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं. विविध पक्षाच्या नेत्यांनी देखील याठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

**सर्वाधिक मतदार**

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील 48 मतदारसंघातील सुमारे सव्वा नऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार संख्येच्या बाबतीत राज्यात पुणे जिल्हा आघाडीवर असून पुण्यात इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वात जास्त मतदार आहेत. पुण्याची एकूण मतदार संख्या 82 लाख 82 हजार 363 आहे.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरीमध्ये महानगरपालिकेच्या सावली निवारा केंद्रात 45 बेघर व्यक्ती राहतात. या व्यक्तिंनी यापूर्वी मतदान केलेलं नंही. या व्यक्तींना प्रथमच मतदान ओळख पत्र देण्यात आलं आहे. या नवोदित मतदारांनी लोकसभा निवडणुकीत मतदान करून

लोकशाही उत्सवात सहभागी व्हावं" असं आवाहन पिंपरी विधानसभा मंतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी केलं.

**<u>पाणी पुरवठा</u>**

पुणे शहराच्या विविध भागात सध्या अपुरा पाणी पुरवठा होत आहे. याच्या निषेधार्थ स्थानिक नागरिकांनी मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशारा दिला आहे; यप्रकरणी खुलासा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कार्यालयानं महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत. पाण्याच्या मुद्द्यावर पुण्यातील मतदानाची टक्केवारी आणखी कमी होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासन विशेष खबरदारी घेत आहे.

**<u>पुणे वनविभाग</u>**

सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याला घेरा सिंहगड हददीतील सांबरेवाडी- थोपटेवाडी इथं विनापरवाना सागाची झाडे तोडणा-या शेतक-याला वन विभागानं येत्या पावसाळ्यात शंभर सागाची झाडे लावण्याची अनोखी शिक्षा सुनावली आहे. सिंहगड वन विभागाचे वन परिमंडळ अधिकारी समाधान पाटील यांनी झाडे जप्त करून सरकारजमा केली. प्रत्येक झाडामागे 200 रूपये प्रमाणे संबंधित शेतकऱ्यांकडून 1800 रूपयाचा दंड देखील वसूल केला आहे.

**<u>रेल्वे</u>**

विविध कारणांमुळे साखळी ओढून रेल्वे थांबवण्याच्या घटनांत वाढ होत आहे. पुणे रेल्वे विभागात गेल्या वर्षात 1420 घटना घडल्या. सर्वाधिक 600 घटना पुणे रेल्वे स्थानकात घडल्या आहेत आणि याचा फटका रेल्वेच्या वेळापत्रकावर होत आहे.

**<u>प्रदूषण</u>**

पुणे शहरातील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी लोकसहभाग वाढवण्यात येणार आहे. त्यासाठी राष्ट्रीय हवामानबदल कृती आराखड्याअंतर्गत पुणे महापालिका नवा आराखडा तयार करत आहे. सध्या हा आराखडा प्राथमिक स्तरावर आहे. यात प्रामुख्यानं हवेतील घातक वायूंचे प्रमाण कमी करणे, धुळीचे प्रमाण कमी करणे अशा उपाययोजनांचा समावेश आहे. यात शहरातील प्रदूषणाचं मोजमाप करण्यावर भर राहणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

पुण्यात 13 वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब टी-20 क्रिकेट स्पर्धा सुरु झाल्या आहेत. अवधुत पायगुडे याच्या अष्टपैलु खेळीमुळे क्रिकस्टार रायझिंग क्रिकेट ॲकॅडमी संघानं व्हिजन क्रिकेट ॲकॅडमीचा 13 धावांनी पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 अंश नोंदवलं गेलं; उद्या दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर. संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**